# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

**बाबासाहेबांच्या स्वप्नातला भारत व्हावा - कुलगुरु**

**विद्यापीठात 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन**

अमरावती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संपूर्ण देशच मानत नाही; तर विश्वसुद्धा मानत आहे. बाबासाहेबांचे विचार व्यापक दृष्टीकोन ठेवून स्वीकारण्याची खरी गरज आहे. महामानव ही पदवी त्यांना भारतीयांनी दिली, यावरुन त्यांचे योगदान, त्यांचे मोठेपण सिद्ध होते. बाबासाहेबांचे विचार व कार्य सर्वांनी अंगीकार करुनच नव्हे; तर प्रत्यक्षात आचरणात आणून बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले.

विद्यापीठात 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' निमित्त आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आज बाबासाहेबांच्या जयंतीप्रसंगी अभिवादनाचा कार्यक्रम विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर घेण्यात आला. त्यानंतर डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्रात संविधान उद्देशिकेच्या वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला, त्याप्रसंगी कुलगुरु बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख व परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते उपस्थित होते.

कुलगुरु म्हणाले, १२५ वी जयंती वर्ष शासनाने समता वर्ष म्हणून साजरे केले. आज बाबासाहेबांची १२७ वी जयंती असून सामाजिक समता सप्ताह शासनाने साजरा केला असून त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. बाबासाहेबांच्या कर्तव्याची जाणीव आता सर्वांना होत आहे. बाबासाहेब ज्या विचारांसाठी जगले, त्या विचारांची महती सर्वांना पटली आहे. या देशात अनेक विचारवंत, थोरपुरुष होवून गेले, त्यांच्यामध्ये वैचारिक मतभेद असणे स्वाभाविक आहे; पण असे असले तरी महत्वाच्या गोष्टींवरुन ते एकत्र यायचे. बाबासाहेबांनी जे विचार या देशाला दिले, त्यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, कामगार, स्त्री विषयक, धर्मसंस्कृती आदीबाबत व्यापक दृष्टीकोन ठेवून ते अंगीकारण्याची गरज आहे. बाबासाहेबांना आलेल्या अनूभवातून ते विचार आले आहेत. त्यांचे व्यवहारिक विचार असून प्रत्यक्षात आचरणात आणण्याची खरी गरज आहे, असेही ते म्हणाले.

प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समरसता दिली, त्याचा अंगीकार व्हायला हवा. विद्यापीठ समाजाच्या केंद्रस्थानी आहे, त्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी सामाजिक समता सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. बाबासाहेबांचे विचार आणि संदेश सर्वांनी आचरणात आणावे, असे ते म्हणाले.

सुरुवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मयोगी संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन आणि वही व पेन देवून अभिवादन करण्यात आले. संचालन प्रा. पवन तायडे यांनी केले. जयंती आणि अभ्यास केंद्रातील कार्यक्रमाला विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी तसेच प्राधिकारिणी सदस्य, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १४/०४/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी